(इंग्रज़ीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**<u>मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात</u>**

**<u>नागपूर खंडपीठ : नागपूर</u>**

**<u>दिवाणी पुनरीक्षण अर्ज क्रमांक १२२ /२०२२</u>**

(१) **अतिरिक्त कार्यकारी अभियंता,**
औदा वाहिनी प्रकल्प उपविभाग,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण
कंपनी मर्यादित, प्रकाश भवन,
गड्डीगोदाम, नागपूर- ४४०००१

(२) **कार्यकारी अभियंता,**
औदा प्रकल्प विभाग क्रमांक 1,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण
कंपनी मर्यादित, दुसरा मजला,
विद्युत भवन, काटोल रोड,
नागपूर - ४४००१३ ............ **<u>अर्जदार</u>**

**//विरुद्ध//**

(१) **श्री. किशोर, मोहनलाल पालीवाल यांचे पुत्र**
वय अंदाजे ५५ वर्षे, व्यवसाय - धंदा,

(२) **श्री. प्रतीक , परमानंद जांबुळकर यांचे पुत्र**
वय अंदाजे २९ वर्षे, व्यवसाय - धंदा,

(३) **श्री. कमलेश, जोगेश्वर साहू यांचे पुत्र**
वय अंदाजे ४६ वर्षे, व्यवसाय - धंदा,

१ ते ३ सर्व, '**संग्राम लॅण्ड डेव्हलपर्स '** चे भागीदार आहेत.
भूमि-विकासक, कार्यालय- भूखंड क्रमांक २२,
मानवसेवा नगर, वटेर्णी महाविद्यालयाच्या मागे,
एलिझाबेथ कॉन्व्हेंट जवळ, नागपूर-४४०००६ ........... **गैर-अर्जदार**

---

श्री. एम. राजकोंडवार, अर्जदारांचे वकील
श्री. पी. एस. सहारे, गैर-अर्जदारांचे वकील

---

**न्यायमंच : न्यायमूर्ती श्रीमती एम. एस. जावलकर**
**दिनांक : ०७/०२/२०२३**

**मौखिक न्यायनिर्णय :-**

. म्हणणे ऐकले.

२. विद्वान सह-दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, नागपूर यांनी नियमित दिवाणी दावा क्र. ५७४/२०२२ मध्ये निशाणी क्र. ९ खाली पारित केलेल्या आदेशाने व्यथित होऊन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांनी प्रस्तुत पुनरीक्षण अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार / प्रतिवादी क्र. १ आणि २ यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९ सह आदेश VII नियम ११ अन्वये वादपत्र फेटाळण्यासाठी सदर अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादींचा विनिर्दिष्ट युक्तिवाद आहे की विद्युत अधिनियम , २००३ (यापुढे 'सदर अधिनियम' असे संदर्भित) च्या कलम १४५ च्या तरतुदींनुसार दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रावर स्पष्टपणे बंदी घालण्यात आली आहे. प्रतिवादी कंपनीचे विरुद्ध घोषणा आणि कायमच्या मनाई आदेशासाठी सदर वादपत्र दाखल केले आहे. वादींनी तात्पुरत्या मनाई आदेशाकरीता सुद्धा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादींच्या युक्तिवादाप्रमाणे,

सदर अधिनियमाच्या कलम १४५ अन्वये असलेल्या प्रतिबंधाच्या दृष्टीने, जे प्रकरण कलम १२६ मध्ये संदर्भित, निर्धारण अधिकारी किंवा कलम १२७ मध्ये संदर्भित अपीलीय प्राधिकारी अथवा सदर अधिनियमांतर्गत नेमणूक केलेले अभिनिर्णय अधिकारी यांना निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहे, अश्या कोणत्याही प्रकरणांच्या बाबतीत वादपत्र विचारात घेण्याचा किंवा कार्यवाही करण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला नाही आणि उक्त अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराच्या अनुषंगाने केलेल्या कोणत्याही कारवाईबाबत कोणत्याही न्यायालयाकडून मनाई आदेश दिले जाणार नाही.

४. अशा प्रकारे दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्र स्पष्टपणे त्या मर्यादेपर्यंत प्रतिबंधित आहे. वीज निर्मिती संयंत्रापासून विनिर्दिष्ट गंतव्यस्थानापर्यंत वीज पुरवठा करण्यासाठी विद्युत टॉवर उभारणे आणि स्थापित करण्याच्या कारवाईला वादी आव्हान देत आहेत. वादींनी प्रतिवादींविरुद्ध तात्पुरता मनाई आदेश देण्याची मागणी केली आहे, ज्यामध्ये दावा मिळकतीत कोणत्याही तृतीय पक्षाचे हितसंबंध निर्माण करण्यापासून प्रतिवादींना रोखण्यात यावा अशी विनंती केली आहे. कंपनी प्राधिकरणाने हाती घेतलेले काम सदर अधिनियमाच्या कलम ४० च्या कक्षेत येते.

५. अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी मद्रास उच्च न्यायालयाने **ए . आय. आर ऑनलाईन २०१९ मद. १७५१ मध्ये प्रकाशित ए. कलिउर रहमान - विरुद्ध - पी. कन्ना** आणि तसेच पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने, **आर. एस. ए. नं. १६६४/२०१५ मध्ये परमिंदर कौर उर्फ सतींदर कौर - विरुद्ध - पंजाब स्टेट पॉवर कॉर्पोरशन लिमिटेड आणि इतर, निर्णयाचा दिनांक : २२/०४/२०१६** यांच्या प्रकरणात दिलेल्या न्यायनिर्णयावर विश्वास दर्शविला आहे.

६. अर्जदारांच्या विद्वान वकिलांनी उद्धृत केलेले सदर न्यायनिर्णय विचारात घेतल्यावर, असे स्पष्ट होते की उक्त अधिनियमाचे कलम १४५ दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राला या कायद्याखालील प्राधिकरणाने केलेल्या कारवाईच्या संदर्भात कोणताही मनाई आदेश

देण्यास प्रतिबंधित करते. सदर अधिनियमाचे कलम १४५ अन्वये विचार करण्यात आलेल्या प्रतिबंधाचे दोन भाग आहेत : (अ) कलमाचा पहिला भाग, कोणतेही प्रकरण जे निर्धारण अधिकाऱ्यास कलम १२६ नुसार किंवा अपीलीय प्राधिकाऱ्यास कलम १२७ नुसार निर्धारित करावे लागते किंवा अभिनिर्णय अधिकाऱ्यास उक्त अधिनियमानुसार, ह्या अधिनियमानुसार किंवा अधिनियमाखाली निर्धारित करण्यास शक्ती प्रदान केलेली आहे, अश्या प्रकरणांच्या संदर्भात दाखल करण्यात येणारे दावे किंवा कार्यवाहीशी संबंधित आहे. (ब) कलमाचा दुसरा भाग कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर सदर कायद्यानुसार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या किंवा प्रस्तावित केलेल्या कोणत्याही कारवाईच्या संदर्भात कोणत्याही कृतीशी संबंधित आहे. म्हणून, फक्त एवढेच नाही की कलम १२६ किंवा कलम १२७ मधील प्रकरणांबाबत दिवाणी न्यायालयासमोरील खटला किंवा कार्यवाही प्रतिबंधित आहे किंवा या अधिनियमांतर्गत निर्णय देणाऱ्या अधिका-यासमोर आहे, परंतु त्यापूर्वीचा खटला किंवा कार्यवाही या कायद्यान्वये कोणत्याही प्राधिकरणाकडून कोणत्याही कारवाईला प्रतिबंध करण्यासाठी किंवा निर्देश देण्यासाठी, मनाई आदेश मागितल्यास दिवाणी न्यायालयालाही प्रतिबंध केला जातो, असे वरील कलम वाचल्यावर स्पष्ट होते. वीज पुरवठ्यासाठी टॉवर बसवणे हे संबंधित कायद्यांतर्गत प्राधिकरणाने किंवा अधिकृत परवानाधारकाने केलेले कृत्य आहे. त्यामुळे त्यांना वीज पुरवठ्यासाठी कोणताही नवीन टॉवर (मनोरा) उभारण्यापासून रोखणारा मनाईचा दावा अधिनियमाच्या कलम १४५ च्या कक्षेत येतो.

७. विचारांती माझ्या मते, विद्वान चौकशी न्यायालयाने उक्त अधिनियमाच्या कलम १४५ मधील तरतुदींचा पूर्णपणे चुकीचा अर्थ लावला. त्यामुळे, विद्वान सह-दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांनी दिलेला आक्षेपित आदेश रद्द करणे आणि फेटाळणे आवश्यक आहे.

८. म्हणून, मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे :-

## <u>आदेश</u>

(अ) सदर दिवाणी पुनरीक्षण अर्ज मंजूर केला जातो.

(ब ) विद्वान सह-दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नागपूर यांनी नियमित दिवाणी दावा क्रमांक ५७४/२०२२ मधील निशाणी क्रमांक ९ अंतर्गत दिनांक: ०४/०७/२०२२ रोजी पारित केलेला आदेश रद्द करून फेटाळण्यात आला आहे.

(क) दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश VII, नियम ११ (ड) अंतर्गत दावा फेटाळण्यात येते.

वरील अटींचे अधीन राहून , सदर दिवाणी पुनरीक्षण अर्ज **निकाली काढण्यात** येतो. प्रलंबित अर्ज, जर काही असतील तर ते निकाली काढले जातील.

**(न्यायमूर्ति )**

## <u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या / तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही तसेच इंग्रज़ी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**X- X- X- X**